# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- ०७/०३/२०१८

पोलीसांना सक्षमपणे नक्षलवादयांच्या विरोधातील तीव्र स्वरूपाची कारवाई करण्यासाठी त्यांना ट्रेनिंग, शस्त्र व आयुधे यासह अचूक व निश्चित स्वरूपाची माहिती (Pinpoint Information) मिळणे अत्यावश्यक असते. ही माहिती गोपनीय बातमीदारांकडून प्राप्त होत असते. अशी माहिती प्राप्त होण्यासाठी गोपनीय बातमीदारांचे व्यापक जाळे असणे आवश्यक आहे. अशा गोपनीय बातमीदारांच्या जीवितास सतत धोका असतो. परंतु असा धोका पत्करून गोपनीय बातमीदार पोलीस दलाची आवश्यक ती मदत करीत असतात. पोलीसांच्या दप्तरी उपलब्ध असलेल्या माहितीच्या अनुसार पोलीस खबरी असल्याच्या संशयावरून गडचिरोली जिल्हयात अनेक पोलीस बातमीदारांची नक्षलवादयांकडून अत्यंत क्रुरपणे हत्या केल्या जात असल्यामुळे खबऱ्यांचे प्रशस्त व व्यापक जाळे निर्माण करण्यास पोलीस दलाला अडचणी येत आहेत. हयात असलेल्या आणि नक्षल हल्ल्यात मृत्यू पावलेल्या पोलीस खबऱ्यांच्या कुटुंबियांच्या मागे पोलीस दल खंबीरपणे उभे आहे असा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. अशा गोपनीय बातमीदारांच्या कुटुंबियांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत सातत्याने मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सा ो. यांच्या मार्गदर्शनाखाली मागणी व पाठपुरावा करण्यात येत होता यास यश मिळाले असून काल दिनांक ०६/०३/२०१८ रोजी गडचिरोली जिल्हयाबाबत नवीन

शासन निर्णय लागू झाला असून यामध्ये गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादयांनी हत्या केलेल्या गोपनीय बातमीदारांच्या कुटुंबातील एक व्यक्तीस विशेष बाब म्हणून जिल्हाधिकारी, गडचिरोली हे पात्रतेनुसार वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदावर नियुक्ती देऊ शकणार आहेत.